नि.फौ.ख.क्र. ८९९/२०२३
**सरकार वि. अमोल आणि इतर**
**नि.क्र. .......**

## दोषारोप

मी, **संजय दि. वानखेडे, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र. १ घोडनदी–शिरूर,** जि. पुणे याद्वारे दोषारोप तुमचे विरुध्द ठेवीत आहे.

१. **अमोल बाबजी निचित**
वय– २७ वर्षे, व्यवसायः शेती,

२. **अक्षय बाळु पानमंद**
वय– २३ वर्षे, व्यवसायः शेती,

३. **सुभाष दिलीप बाबर**
वय– २३ वर्षे, व्यवसायः शेती,
सर्व रा. वडनेर, ता.शिरुर. जि. पुणे.

तो येणे प्रमाणे–

**१.** दि.०९/०४/२०२३ रोजी ०८.३० वाजताच्या सुमारास मौजे. वडनेर, ता. शिरुर, जि. पुणे गावचे हद्दीत टेकेवाडी येथे फिर्यादीच्या रहत्या घराजवळ फिर्यादीने तुम्हाला गोठयाची भीत पाडल्याबाबत विचारणा केल्याचा राग मनात धरुन तुम्ही संगणमत करुन फिर्यादी व तिच्या आईल बांबुने मारहाण करुन फिर्यादीच्या आईच्या डाव्या हातावर मारहाण करुन आपखुशीने दुखापत करुन जखमी केले. म्हणून तुम्ही ***भा.दं.वि. कलम ३२४ सह कलम ३४*** प्रमाणे गुन्हा केला आहे व माझे दखलगिरीत आहे.

२. वरील तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही आपसांत संगणमत करुन फिर्यादी व साक्षीदारास सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा या उद्देशाने प्रक्षोभित करून उद्देशपुर्वक शिवीगाळ केलात. म्हणून तुम्ही ***भा.दं.वि.का. कलम ५०४ सह कलम ३४*** प्रमाणे गुन्हा केला आहे व माझे दखलगिरीत आहे.

३. वरील तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही आपसांत संगणमत करुन फिर्यादी व साक्षीदारास फौजदारीपात्र दमदाटी करून जिवे मारण्याची धमकी दिली. म्हणून तुम्ही

***भा.दं.वि.का. कलम ५०६ सह कलम ३४*** प्रमाणे गुन्हा केला व माझे दखलगिरीत आहे.

**४.** वरील तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही आपसांत संगणमत करुन फिर्यादीच्या राहत्या घरात गुन्हा करण्याच्या उद्देशाने अनाधिकाराने गृह अतिक्रमण केले म्हणून तुम्ही ***भा.द.वि.का. कलम ४५२ सहकलम ३४*** प्रमाणे गुन्हा केला आहे व माझे दखलगिरीत आहे.

मी या द्वारे असे निर्देशित करतो की, तुम्हा विंरुध्द वरील प्रमाणे दोषारोप ठेवून संपरीक्षा करणार आहे.

SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Digitally signed by SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE Date: 2026.07.14 18:45:44 +0530

**(संजय दि. वानखेडे)**

दि.१४/०७/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,न्यायालय क्र. १
घोडनदी, ता. शिरुर, जि. पुणे

वरील दोषारोप आरोपीला समजेल असे वाचुन दाखविला व समजावुन सांगितले. ते म्हणतात गुन्हा कबुल नाही.

SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
Digitally signed by SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE Date: 2026.07.14 18:45:41 +0530

**(संजय दि. वानखेडे)**

दि.१४/०७/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,न्यायालय क्र. १
घोडनदी, ता. शिरुर, जि. पुणे